# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**
**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३**

## अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २१**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एम-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- १०,००,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ५२९२ | १० | मुंबई शहर व आसपासच्या विभागात शिधावाटप कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची ४० टक्के कमतरता असल्याची बाब निदर्शनास आली असणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांची कमतरता असल्या कारणाने सामान्य नागरिकांना विशेषत: जे मानखुर्द – शिवाजीनगर सारख्या झोपडपट्टी विभागात राहणारे नागरिक आहे अशा लोकांना शिधावाटप पत्रिका मिळण्यास व धान्य मिळण्यासाठी अडचण निर्माण होत असणे, शिधावाटप कार्यालयामध्ये असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांची नियुक्ती करून असणारी कमतरता लवकरात लवकर आवश्यकता, याबाबत शासनातर्फे करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५२९५ | १० | राज्यशासन अंत्योदय (दारिद्ररेषे खालील) व अन्नसुरक्षा योजनांतील कार्डधारकांना धान्य मिळत असणे, सोलापूर जिल्ह्यात नवीन विभक्त, दुबार रेशन कार्ड नवीन नांव सामाविष्ठ करणे, नाव कमी करणे यासाठी अनेक लाभार्थ्यांनी अर्ज केलेले असणे, शासनाच्या अनेक विविध योजनांसाठी, दवाखान्यासाठी व शालेय शिक्षणासाठी, उत्पन्नाचा दाखला मिळणेसाठी रेशन कार्ड आवश्यक असताना जिल्ह्यामध्ये कर्मचारी नसल्याचे कारण सांगून गेल्या ५ ते ६ महिने होवून रेशन कार्ड मिळत नसल्याने नागरीकांना नाहक त्रास होत असणे, यासंदर्भात सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तहसिल कार्यालयांकडे लाभार्थ्यांना नवीन विभक्त, दुबार रेशन कार्डधारक, रेशन कार्ड दुरुस्ती करणेसाठी नवीन रेशनकार्ड देणेसंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (३) | ५३०० | १० | मुंबईतील गोरेगाव पूर्व येथे आरे कॉलनी युनिट क्रमांक २ मध्ये शिधा वाटप करण्यासाठी आणलेल्या धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत पोलिसांनी धाड टाकून करोडो रुपयांचा साठा जप्त केला असणे, तसेच राज्यात इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आशा कारवाया केल्या असणे, अनधिकृतरित्या पशू व दुग्ध विकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या गोदामात परवानगी न घेता अधिकारी वर्ग यांच्या संगमताने शासकीय महसूल (भाडे) बुडवून शिधा वाटप न करता गैर पद्धतीने काला बाजार करण्यासाठी गोदामात साठा करुण ठेवला असणे, अन्नधान्याच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करोडो रुपयाचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर मागील काळात कोणतीच कारवाई झाली नसणे, या प्रकरणी सखोल चौकशी करून शासनाच्या शिधावाटप धान्याचा करोडो रुपयाचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कठोर स्वरूपाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५३०३ | १० | आदिवासी विकास महामंडळामार्फत किमान आधारभूत किंमतीअंतर्गत शेतक-यांसाठी राबविण्यात येणा-या धान खरेदी योजनेत झालेल्या कोटयावधी गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या प्रमुखाविरुध्द विनाबँक गॅरंटी धान्य दिल्याप्रकरणी चौकशी सुरु असणे, समितीतील उर्वरित तीन सदस्यांच्या सेवा राज्य शासनाने गैरव्यवहारप्रकरणी समाप्त केल्या असल्याने या अधिका-यांमार्फत चौकशी करण्यात येऊ नये अशी मागणी आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे केली असताना शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५३०९ | १० | पामऐवजी केंद्र शासनाने सोयाबीन, मोहरी, भूईमूग आणि सूर्यफूल उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली असणे, या संदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावयाचा पाठपुरावा. |
| | | | **मागणी क्रमांक: एम-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०८, अन्न साठवण व वखार**<br>**रूपये:- ३१,४५,०४,९०,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (६) | ५२५३ | १० | नुरबाग शिधावाटप कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शिधा वाटप केंद्रात अपुरा व निकृष्ट दर्जाचा अन्नधान्याचा पुरवठा होत असल्याने ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, याकरीता शासनाने अन्नसाठा चांगल्या प्रतीचा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ५२५६ | १० | सी.पी.टँक शिधावाटप कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शिधा वाटप केंद्रात अपुरा व निकृष्ट दर्जाचा अन्नधान्याचा पुरवठा होत असल्याने ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, याकरीता शासनाने अन्नसाठा चांगल्या प्रतीचा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५२६१ | १० | गिरगाव शिधावाटप कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शिधा वाटप केंद्रात अपुरा व निकृष्ट दर्जाचा अन्नधान्याचा पुरवठा होत असल्याने ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, याकरीता शासनाने अन्नसाठा चांगल्या प्रतीचा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ५२६४ | १० | गायवाडी शिधावाटप कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शिधा वाटप केंद्रात अपुरा व निकृष्ट दर्जाचा अन्नधान्याचा पुरवठा होत असल्याने ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, याकरीता शासनाने अन्नसाठा चांगल्या प्रतीचा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१०) | ५२६६ | १० | ग्रँटरोड शिधावाटप कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शिधा वाटप केंद्रात अपुरा व निकृष्ट दर्जाचा अन्नधान्याचा पुरवठा होत असल्याने ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असणे, याकरीता शासनाने अन्नसाठा चांगल्या प्रतीचा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (११) | ५२९० | १० | राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत २०२३ या वर्षात प्राधान्य गट आणि अंत्योदय गटातील पात्र रेशन कार्डधारक लाभार्थ्यांना मोफत धान्य वितरीत करण्यात येत असून या मोफत धान्य वितरणाचे रेशन दुकानदारांना किती मोबदला मिळणार यासंदर्भात शासनाकडून कुठल्याही सूचना नसणे , मोफत धान्य वितरणाचे रेशन दुकानदारांना मोबदला देण्याबाबत शासन स्तरावरून कोणताही निर्णय झालेला नसणे , यामुळे राज्यातील रास्त धान्य दुकानदारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , मोफत धान्य वितरीत करण्यात येत असल्याने या मोफत धान्य वितरणाचे रेशन दुकानदारांना मोबदला देण्याची नितांत आवश्यकता , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५३०६ | १० | राज्य शासनाने नुकतेच विदर्भ आणि मराठवाड्यातील अवर्षणग्रस्त जिल्ह्यातील केशरी कार्डधारक धान्याएवजी शेतकऱ्यांना १५० रुपये प्रतीव्यक्ती डीबीटी प्रणालीद्वारे रक्कम दिली जात असण्याचे शासन निर्णय निर्गमीत केलेला असणे , परंतु इतक्या कमी रकमेत शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारची धान्याची खरेदी बाजारभावात होणार नसणे , या निर्णयामुळे दोन्ही विभागातील रास्तभाव दुकांदारांची आर्थिक कोंडी झालेली असणे , आधीच डबघाईस आलेल्या रास्त भाव दुकानदारांवर या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट ओढवले जाणार असणे, यामुळे या विभागातील रास्त धान्य दुकांदारांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने सदर निर्णय रद्द करून धान्य देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१३) | ५२०६ | १० | दिवाळीप्रमाणे गुढी पाडवा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतज निमित्त शिधा वाटप पत्रिकाधारकांना राज्यातील नागरीकांना “आनंदाचा शिधा” देण्याचा निर्णय २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेतला असणे, मात्र अद्याप सदरच्या योजने अंमलबजावणी झाली नसणे, शिधावाटप पत्रिकाधारकांना १०० रुपयात २ किलो रवा, २ किलो चणाडाळ, २ किलो साखर आणि २ लिटर पामतेल देण्याची गरज असून त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राजयातील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१४) | ५२११ | १० | राज्यात अंत्योदय योजना राबविण्यात येत असणे, मौ. सिरसम (पालक) ता.पालम,जि.परभणी येथे अंत्योदय योजनेचे लाभार्थी कमी असणे, पालम तालुक्यात या योजनेचे माहिती नसणे, पालम तालुक्यात अंत्योदय योजने अंतर्गत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | १० किलो गहू आणि ३० किलो तांदूळ देण्याची आवश्यकता असणे, तसेच इतर धान्य देण्याची गरज अससणे, परभणी जिल्हयात अंत्योदय योजना राबविणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१५) | ५२२४ | १० | नागपूर, नांदेड, परभणी व लातूर जिल्हयात राज्यय शासनाने सार्वजनिक ठिकाणी लोकांना परवडणाऱ्या दारात वायफाय तसेच इंटरनेट सुविधा रेशनिंग दुकानाच्या माध्यमातून पुरविला जाणार असणे, यासाठी बीएसएनएलशी करार सेवा असणे, मात्र अद्याप सुविधा मिळत असणे, शिधावाटप दुकानाच्या १०० ते २०० लिटर परिघात लोकांना सवलतीच्या दरात इंटरनेट सुविधा घेता येणार असणे, त्यानुसार अद्याप सुविधा मिळत नसणे, सुविधा मिळण्याची गरज निर्माण झाली असणे, मोफत दरात इंटरनेट सुविधा देण्याची आवश्यकता असणे, सदरची प्रक्रिया सुरु करण्यायची आवश्यकता असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१६) | ५२३७ | १० | ठाणे जिल्हयातील मुंब्रा येथील शिधावाटप दुकानासाठी २० टन तांदूळ पाठविला असणे, मात्र सदरचा तांदूळ भिवंडी येथे न जाता परस्पर भिवंडीला गेला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये उघड झाले असणे, तांदळाचे २ टेम्पो मुंब्रा येथे न जाता ते भिवंडी येथे गेला असणे, वितरणात अनागोंदी कारभार निर्माण झाला असणे, यात मोठयाप्रमाणावर भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाला असणे, यात संबंधित अधिकाऱ्यांचे वित्त संबंध असणे, त्यामुळे असे प्रकार घडत असणे, याची चौकशी करण्याची आवश्यकता असणे, त्याचप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चोकशी करुन कठोर कारवाई करण्याची गरज असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ५२४३ | १० | मालवणी, खारोडी, मालवणी चर्च, आक्सास, मार्वे रोड, मालाड (प.) मुंबइ या परिसरातील शिधावाटप पत्रिकाधारकांना शिधावाटप दुकानावर पूर्ण रेशन मिळत नसणे, तांदूळ, रॉकेल व साखर मिळत नसणे, रेशन पत्रिकाधारक मेटाकुटीत आला असणे, शिधावाटप पत्रिकाधारकांना रेशन मिळण्याची आवश्यकता निमाण झाली असणे, संबंधित शिधावाटपअधिकारी रेशन दुकानधारकाचे संगनमत असणे, त्यामुळे दुकानावर रेशन मिळत नसणे, संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, कर्तव्यात कसूर व कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी कठोर कार्यवाह करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एम-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४०८, अन्न साठवण व वखार यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,१७,७३,४१,४७,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१८) | ५१६९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्यात शासनाकडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी केल्या जात असणे, मात्र खरेदी केलेल्या धानाची साठवणूक करण्यासाठी गोदामाची संख्या कमी असल्याने खरेदी केलेला धान उघडयावर ठेवावे लागत असणे, त्यामुळे अवेळी येत असलेल्या अवकाळी पावसामुळे खरेदी केलेला धान खराब होत असून यात शेतकऱ्यांसह शासनाचे कोटयावधी रूपयांचे नुकसान होत असणे, तसेच गोदामा अभावी शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी सुध्दा करण्यात येत नसणे, या कारणास्तव ब्रम्हपूरी शहरासह तालुक्यातील मोठया गावात किमान नवीन चार गोदामाची शेतकऱ्यानी मागणी करणे, याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी शहरासह तालुक्यातील मोठया गावात किमान चार नवीन गोदामाच्या बांधकाम करणे व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (१९) | ५१७० | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यात शासनाकडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी केल्या जात असणे, मात्र खरेदी केलेल्या धानाची साठवणूक करण्यासाठी गोदामाची संख्या कमी असल्याने खरेदी केलेला धान उघडयावर ठेवावे लागत असणे, त्यामुळे अवेळी येत असलेल्या अवकाळी पावसामुळे खरेदी केलेला धान खराब होत असून यात शेतकऱ्यांसह शासनाचे कोटयावधी रूपयांचे नुकसान होत असणे, तसेच गोदामा अभावी शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी सुध्दा करण्यात येत नसणे, या कारणास्तव सिंदेवाही शहरासह तालुक्यातील मोठया गावात किमान नवीन चार गोदामाची शेतकऱ्यानी मागणी करणे, याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही शहरासह तालुक्यातील मोठया गावात किमान चार नवीन गोदामाच्या बांधकाम करणे व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२०) | ५१७१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यात शासनाकडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी केल्या जात असणे, मात्र खरेदी केलेल्या धानाची साठवणूक करण्यासाठी गोदामाची संख्या कमी असल्याने खरेदी केलेला धान उघडयावर ठेवावे लागत असणे, त्यामुळे अवेळी येत असलेल्या अवकाळी पावसामुळे खरेदी केलेला धान खराब होत असून यात शेतकऱ्यांसह शासनाचे कोटयावधी रूपयांचे नुकसान होत असणे, तसेच गोदामा अभावी शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी सुध्दा करण्यात येत नसणे, या कारणास्तव सावली शहरासह |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तालुक्यातील मोठया गावात किमान नवीन चार गोदामाची शेतकऱ्यानी मागणी करणे, याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सावली शहरासह तालुक्यातील मोठया गावात किमान चार नवीन गोदामाच्या बांधकाम करणे व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२१) | ५१७२ | १० | गडचिरोली जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात शासनाकडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी केल्या जात असणे, मात्र खरेदी केलेल्या धानाची साठवणूक करण्यासाठी गोदामाची संख्या कमी असल्याने खरेदी केलेला धान उघडयावर ठेवावे लागत असणे, त्यामुळे अवेळी येत असलेल्या अवकाळी पावसामुळे खरेदी केलेला धान खराब होत असून यात शेतकऱ्यांसह शासनाचे कोटयावधी रूपयांचे नुकसान होत असणे, तसेच गोदामा अभावी शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी सुध्दा करण्यात येत नसणे, या कारणास्तव गडचिरोली तालुक्यातील मोठया गावात गोदामाची शेतकऱ्यानी मागणी करणे, याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी गडचिरोली जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात मोठया गावात किमान दोन नवीन गोदामाच्या बांधकाम करणे व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १६ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई